# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **नागपूर, दि. २९ ऑक्टोबर २०१९**

# महापौरांनी केली छठ पूजा तयारीची पाहणी

**नागपूर, ता. २९ :** उत्तर भारतीयांचा धार्मिक उत्सव छठ पूजा नागपुरात हर्षोल्हासात साजरा केला जातो. यासाठी अंबाझरी आणि फुटाळा तलाव येथे मोठ्या संख्येने भाविक एकत्रित येतात. भाविकांसाठी दरवर्षी नागपूर महानगर पालिकेच्या वतीने सोयी सुविधा पुरविण्यात येतात व सुरक्षेच्या दृष्टीने तयारी करण्यात येते. यावर्षी २ व ३ नोव्हेंबर रोजी साजरा करण्यात येणाऱ्या उत्सवानिमित्त करण्यात येणाऱ्या व्यवस्थेची पाहणी महापौर नंदा जिचकार यांनी मंगळवारी (ता. २९) केली.

यावेळी त्यांच्यासोबत उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी उपस्थित होते.

बहुराष्ट्रीय छठ पूजा व्रत समितीच्या वतीने महानगर पालिकेच्या सहयोगाने सदर आयोजन करण्यात येते. हजारोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना त्रास होऊ नये याची काळजी मनपाच्या वतीने घेण्यात येते.

पावसामुळे अंबाझरी तलाव परिसरात गवत मोठ्या प्रमाणात वाढले आहे. ते गवत कापण्यात यावे आणि भाविकांना सोयीचे व्हावे यासाठी स्वामी विवेकानंद स्मारकाच्या बाजूने तलावापर्यंत येण्यासाठी सुरक्षित रस्ता तयार करण्याचे निर्देश

यावेळी महापौर नंदा जिचकार यांनी दिले. फुटाळा तलावावरही भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने संपूर्ण व्यवस्था करण्याचे निर्देश स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे आणि ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी यांनी दिलेत. यावेळी नगरसेविका रूपा राय, नगरसेवक कमलेश चौधरी, पं. अशोककुमार शुक्ला, शैलेंद्र अवस्थी, छठ पूजा व्रत समितीचे संस्थापक अध्यक्ष शेखर राय, ब्रजभूषण शुक्ला, प्रा. बद्रीप्रसाद पांडे, अमोल कोल्हे, संजय शर्मा उपस्थित होते.

.........................................................................................................
.

# महापौर नंदा जिचकार ने किया छठ पुजा तैयारियों का निरीक्षण

**नागपुर, २९ :** महापौर श्रीमती नंदा जिचकार ने 2 व 3 नवंबर को आयोजित छठ पर्व की तैयारियों का मंगलवार को निरीक्षण किया। नागपुर शहरवासी छठ पूजा पर सूर्य देवता की उपासना अंबाझिरी व फुटाला तालाब में हर्षोल्लास से करते हैं ।

उपमहापौर दीपराज पारडीकर, स्थायी समिति अध्यक्ष प्रदीप पोहाणे, वरिष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी ने संयुक्त दौरे में स्वास्थ्य विभाग के अधिकारियों को निर्देश दिया कि वे बारिश के कारण बढ़ी हुई घास को काट दे तथा श्रद्धालुओं के लिए स्वामी विवेकानंद जी के स्मारक के करीब से तालाब तक जाने हेतु एक अतिरिक्त सुरक्षित मार्ग बनाएं ताकि भाविको को परेशानी नहीं हो। एवं श्रृद्धालुओं की भीड़ पर नियंत्रण रह सके बहुराष्ट्रीय छठ पूजा व्रत समिति द्वारा महानगर पालिका के सहयोग से छठ पूजा का आयोजन किया जाता है। हजारों श्रद्धालु इस कार्यक्रम में शामिल होते हैं। फुटाला के समीप की जा रही तैयारियों का जायजा

लेते हुए प्रदीप पोहाणे व दयाशंकर तिवारी ने सुरक्षा के सभी इंतजाम करने का भी निर्देश दिया। विशेष उल्लेखनीय है कि मनपा द्वारा छठ पूजा पर्व के प्रसंग पर आंबाझरी तालाब,फुटाला तलाब, पोलिस लाईन टाकली तलाब, गोरेवाड़ा पीली नदी उद्गम स्थल इन स्थानों पर छठ व्रतियों हेतु प्रशासन द्वारा सुविधा उपलब्ध कराई गई है इस अवसर पर नगरसेविका रुपा राय, नगरसेवक कमलेश चौधरी, पं अशोक कुमार शुक्ला,शैलेंद्र अवस्थी, छठ पूजा व्रत समिति के संस्थापक अध्यक्ष शेखर राय,ब्रजभूषण शुक्ला, प्राध्यापक बद्रीप्रसाद पांडे, ब्रिजभूषण शुक्ला,अमोल कोल्हे, संजय शर्मा उपस्थित थे ।